## निशाणी ३९ खालील आदेश

( रत्नमाला माळी वि. संतोष भंडारे वगैरे )

१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला असुन त्या अनुषंगे दाव्याचे कामी अतिरिक्त दावा मिळकत व अतिरीक्त पक्षकार समाविष्ट करणेकरिता तसेच त्या अनुषंगे दाव्याच्या कथनामध्ये वाढीव मजकुर नमुद करणेकरिता दुरुस्ती करण्यास परवानगी मागीतलेली आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी नं.१ ते ४ यांचेतर्फे म्हणणे दाखल झालेले असुन त्यांचे मते वादीने काम लांबविण्याच्या हेतूने सदरचा अर्ज दिलेला असुन तो नामंजुर होणेस पात्र आहे.

३. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटप व निरंतर ताकिदीकरिता दाखल केलेला असुन प्रस्तुतचा दावा हा अद्याप प्रतिवादीतर्फे कैफियत दाखल करणेकरिता प्रलंबीत आहे. वादी प्रस्तुत अर्ज देवुन दावेचे कामी अन्य मिळकती हया दावा मिळकती म्हणुन समाविष्ट करु इच्छीत आहे. तसेच वादी ही दावेचे कामी प्रस्तावित दुरुस्ती अन्वये दावा मिळकतीमधील सर्व हितसंबंधीत इसमांना दावेचे कामी पक्षकार करु पहात आहे. तसेच वादी ही दावेचे कथनांमध्ये जादा पक्षकार यांना दावेचे कामी कोणत्या कारणाकरिता समाविष्ट करत आहेत याबाबतचा तपशील नमुद करणेकरिता दाव्याच्या कथनांमध्ये दुरुस्ती मागत आहे. वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर झालेस प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दावा मिळकतीमध्ये हितसंबंध असणा–या सर्व लोकांचे वाद एकाचवेळी निर्णयीत झालेमुळे संपूष्टात येणार आहेत. तथापी सदरचा दावा दुरुस्ती अर्ज नामंजुर झालेस वादी व प्रतिवादी व अन्य हितसंबंध असणारे लोक

यांचे दरम्यान नविन वाद निष्पन्न होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब या सर्व कारणांचा विचार होवुन मला वादीचा अर्ज मंजुर करणे न्यायोचीत वाटत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. प्रस्तावित दुरुस्ती अन्वये प्रतिवादी नं.८ ते २१ यांना दावेचे कामी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १ नियम १० अन्वये समाविष्ट करणेत येत आहे.

३. वादीने अर्जामध्ये नमुद केलेली प्रस्तावित दुरुस्ती सदर आदेशापासुन १४ दिवसांचे आत दुरुस्ती करणेची असुन दावा दुरुस्ती प्रत विनाविलंब दाखल करणेची आहे.

४. वादीने प्रस्तावित दुरुस्ती अनुषंगे दावा मिळकत म्हणुन अन्य मिळकती समाविष्ट केलेल्या असल्यामुळे त्याचे मुल्यांकनानुसार होणारी कोर्ट फी न्यायालयामध्ये त्वरीत सादर करणेची आहे.

५. वादीने प्रतिवादी नं.८ ते २१ यास नोटीस/ समन्स पाठविणेकरिता आवश्यक असणारी दावा प्रत, कागदपत्रके, अंतरिम दाद मागणी अर्ज असलेस दाखल करणेचे आहे तसेच आवश्यक असणारी प्रोसेस फी तात्काळ न्यायालयात जमा करणेची आहे.

६. खर्चाबाबत आदेश नाही.

**सही /-**

**दिनांक ११.०७.२०१८.** **( श्रीमती. दुर्गा भ. सुतार )**

**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

कडेगांव.